| MHAH060003322025 | दाखल दिनांक | : | २४ | ०२ | २०२५ |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २४ | ०२ | २०२५ |
| | निकाल दिनांक | : | ०२ | ०४ | २०२६ |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | : | ०१ | ०१ | ०९ |

भाग – अ
नमुना क्र.३२
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(i) अन्वये)

श्रीरामपूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.३) यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : विदया एस. कसबे)

नियमीत फौजदारी खटला क्र.७५/२०२५ अपराध क्र.I-४०७/२०२४
संगणकीकृत नोंदणी क्र.एम.एच.ए.एच.०६-०००३३२-२०२५ निशाणी क्र.५७

महाराष्ट्र शासन व्दारा
श्रीरामपुर तालुका पोलीस स्टेशन, :
ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर. अभियोग पक्ष

विरूध्द

१. मयुर उर्फ हरीष पांडुरंग विटकरे
वय – २६ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,
२. संदिप दगडु विटकरे
वय – ३५ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,
३. संकेत पांडुरंग विटकरे
वय – २१ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,
४. पांडुरंग शंकर विटकरे :
वय – ६३ वर्षे, व्यवसाय – शेती,
५. सोपान शंकर विटकरे (मयत)
६. निर्मला सोपान विटकरे
वय – ६३ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
सर्व रा. मालुंजा बु., ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर. आरोपी

अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ : विधिज्ञ श्री. एम. एफ. पर्बत
आरोपीतर्फे विधीज्ञ विधिज्ञ श्री. आर. डी. भोसले

## भाग – ब
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १९.०७.२०२४ |
| २. | फिर्याद दाखल दिनांक | : | २०.०७.२०२४ |
| ३. | दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | २४.०२.२०२५ |
| ४. | दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | ०९.०४.२०२५ |
| ५. | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | १७.०३.२०२६ |
| ६. | न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | -- |
| ७. | न्यायनिर्णय दिनांक | : | ०२.०४.२०२६ |
| ८. | न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | : | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपींचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मयुर उर्फ हरीष पांडुरंग विटकरे | -- | ०९.०४.२०२५ | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम १९० प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | संदिप दगडु विटकरे | -- | ०९.०४.२०२५ | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम १९० प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३. | संकेत पांडुरंग विटकरे | -- | ०९.०४.२०२५ | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम १९० प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ४. | पांडुरंग शंकर विटकरे | -- | ०९.०४.२०२५ | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम १९० प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ५. | सोपान शंकर विटकरे | -- | ०९.०४.२०२५ | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम १९० प्रमाणे | अबेट | मयत | मयत |
| ६. | निर्मला सोपान विटकरे | -- | ०९.०४.२०२५ | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम १९० प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

भाग – क
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)
सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निखील बाळासाहेब वाकचौरे | फिर्यादी | ४७ |
| २. | वैशाली बाळासाहेब वाकचौरे | साक्षीदार | ४८ |
| ३. | मोनाली संतोष वाकचौरे | साक्षीदार | ४९ |
| ४. | सोपान लक्ष्मण वाकचौरे | साक्षीदार | ५० |

ब. आरोपीचे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | -- | -- |

क. न्यायालयाचे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | -- | -- |

अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील

अ. अभियोग पक्ष

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | निरंक | -- |

ब. आरोपी

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | निरंक | -- |

क. न्यायालय

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | निरंक | -- |

मुद्देमालाचा तपशील

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | एक ३ फुट ७ इंच लांबीची लाकडी काठी | -- |

| | | |
|---|---|---|
| २. | एक ३ फुट ६ इंच लांबीची लाकडी काठी | -- |
| ३. | दोन विटेचे तुकटे | -- |

## न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक : ०२.०४.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्र.१ ते ६ यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम १९० अन्वये खटला चालविण्यात आला. खटल्यादरम्यान आरोपी क्र. ५ हे मयत झाले आहेत, करिता सदरचे प्रकरण त्यांच्याविरुध्द अबेट करण्यात आले.

अभियोग पक्षाच्या खटल्याचा सारांश खालील प्रमाणेः-

**०२.** निखील बाळासाहेब वाकचौरे (न्यायनिर्णयाकरिता ईथून पुढे त्यांना फिर्यादी म्हणून संबोधन्यात येते), राहणार मालुंजा बु., ता. श्रीरामपूर यांनी फिर्याद दाखल केली की, दि.१९.०७.२०२४ रोजी सकाळी १०.३० वा .सुमारास ते, आजोबा सोपान वाकचौरे, चुलती मोनाली वाकचौरे, आई वैशाली वाकचौरे असे त्यांच्या घरासमोरील मोकळया जागेतील गवत काढत असतांना त्यांचे शेजारील सोपान शंकर विटकरे, निर्मला सोपान विटकरे तेथे येऊन "ही जागा आमची आहे, तुम्ही येथील गवत काढु नका" असे म्हणाले. त्यावर "सदरची जागा ही सरकारी असुन, तुम्ही ती का साफ करु देत नाही ?" असे म्हणाल्याचा राग आला असता, आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली. त्यावेळी "तुम्ही शिवीगाळ का करता?" असे फिर्यादी त्यांना म्हणताच सोपान शंकर विटकरे यांनी फिर्यादीचे आजोबा सोपान वाकचौरे यांना धक्काबुक्की करण्यास सुरुवात केली. ते सोडवासोडव करण्याचा प्रयत्न करीत असतांना तेथे १. संदिप दगडु विटकरे, २. पांडुरंग शंकर विटकरे, ३. संकेत पांडुरंग विटकरे, ४. मयुर पांडुरंग विटकरे हे हातात लाकडी काठया व विटा घेऊन पळत आले व त्यांना मारहाण करु लागले. मयुर याने त्याचे हातातील लाकडी काठीने त्यांच्या डाव्या पायाच्या गुडघ्यावर, दोन्ही हातावर व डोक्यात मारहाण केली. पांडुरंग विटकरे यांनी त्यांना लाथाबुक्कयांनी मारहाण केली. तेव्हा आई वैशाली, चुलती मोनाली या सोडवा-सोडव करण्यास आल्या असता, त्यांना देखील आरोपींनी लाकडी काठी व विटांनी हातावर, पाठीवर मारहाण केली. सदर मारहाणीत त्यांच्या आईच्या उजव्या हाताच्या दंडाला व डाव्या हाताच्या बोटाला मार लागला. तसेच चुलती मोनाली यांना सर्व आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यांचा आरडाओरडा ऐकुन गल्लीतील लोक जमा झाले. सर्व आरोपींनी त्यांना "आमच्या नादी लागले तर गाडी खाली घालुन मारुन टाकु" अशी

धमकी दिली व निघुन गेले. त्यांना मार लागल्याने वडील बाळासाहेब वाकचौरे व चुलते संतोष वाकचौरे यांनी त्यांना साखर कामगार हॉस्पीटल येथे दाखल केले. सबब, त्यांनी आरोपींविरूद्ध तक्रार दाखल केली.

०३. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय की, दिनांक १९.०७.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजणेच्या सुमारास फिर्यादी व आरोपीच्या घरासमोर, मालुंजा बु., ता. श्रीरामपुर येथे आरोपी फिर्यादी व साक्षीदार यांना दुखापत पोहोचविण्याच्या सामाईक उद्देशपुर्तीकरीता बेकायदेशीर जमावाचे घटक झाले ? | ....नकारार्थी |
| २. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले का की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्यांच्या सामाईक उद्देशपुर्तीकरीता दंगा केला ? | ....नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्यांच्या सामाईक उद्देशपुर्तीकरीता गुन्हा करण्याच्या उद्देशाने फौजदारीपात्र बलप्रयोग केला ? | ....नकारार्थी |
| ४. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्यांच्या सामाईक उद्देशपुर्तीकरीता आरोपी क्र.१ यांनी फिर्यादी निखील यांना लाकडी काठीने डाव्या पायाच्या गुडघ्यावर, दोन्ही हातावर व डोक्याला मारहाण करुन स्वेच्छापूर्वक गंभीर दुखापत पोहोचविली ? | ....नकारार्थी |
| ५. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्यांच्या सामाईक उद्देशपुर्तीकरीता आरोपींनी फिर्यादी व | ....नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | साक्षीदार यांना लाकडी काठया व विटांनी मारहाण करुन स्वेच्छापूर्वक साधी दुखापत पोहोचविली ? | |
| ६. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्यांच्या सामाईक उद्देशपुर्तीकरीता फिर्यादी व साक्षीदारांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन स्वेच्छापूर्वक साधी दुखापत पोहोचविली ? | ....नकारार्थी |
| ७. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्यांच्या सामाईक उद्देशपुर्तीकरीता फिर्यादी व साक्षीदारांना फौजदारीपात्र धाकदपटशाह करुन जीवे मारण्याची धमकी दिली ? | ....नकारार्थी |
| ८. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्यांच्या सामाईक उद्देशपुर्तीकरीता सार्वजनिक शांतताभंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला? | ....नकारार्थी |
| ९. | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ ते ८ करिता:-**

०४. निखील बाळासाहेब वाकचौरे (सा.क्र.१) या फिर्यादी असून त्यांनी पुराव्यादरम्यान कथन केले की, आरोपी मालुंजा येथे त्यांचे शेजारी आहेत. दि.२१.०७.२०२४ रोजी सकाळी १०.३० ते ११.०० वा. सुमारास त्यांच्या घरासमोर मालुंजा येथे घटना घडली. त्यावेळी त्यांच्यात व आरोपींमध्ये किरकोळ भांडण झाले होते. याव्यतिरिक्त काही घडले नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी फिर्यादवरील सही मान्य केली, परंतु मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली.

**०५.** वैशाली बाळासाहेब वाकचौरे (सा.क्र.२) हे जखमी साक्षीदार असून त्यांनी पुराव्यादरम्यान कथन केले की, फिर्यादी त्यांचा मुलगा आहे. आरोपी त्यांचे नातेवाईक व शेजारी आहेत. दि.२२.०७.२०२४ रोजी सकाळी ११.०० ते ११.३० वा. सुमारास त्यांच्या घरासमोर मालुंजा येथे घटना घडली. त्यावेळी त्यांच्यात व आरोपींमध्ये किरकोळ भांडण झाले होते. याव्यतिरिक्त काही घडले नसल्याचे त्यांनी सांगितले.

**०६.** मोनाली संतोष वाकचौरे (सा.क्र.३) हे जखमी साक्षीदार असून त्यांनी पुराव्यादरम्यान कथन केले की, फिर्यादी त्यांचा पुतण्या आहे. आरोपी त्यांचे नातेवाईक व शेजारी आहेत. दि.१९.०७.२०२४ रोजी सकाळी १०.३० ते ११.०० वा. सुमारास त्यांच्या घरासमोर मालुंजा येथे घटना घडली. त्यावेळी त्यांच्यात व आरोपींमध्ये किरकोळ भांडण झाले होते. याव्यतिरिक्त काही घडले नसल्याचे त्यांनी सांगितले.

**०७.** सोपान लक्ष्मण वाकचौरे (सा.क्र.४) हे देखील जखमी साक्षीदार असून त्यांनी पुराव्यादरम्यान कथन केले की, फिर्यादी त्यांचा नातु आहे. आरोपी त्यांचे नातेवाईक व शेजारी आहेत. घटनेची तारीख, वेळ व ठिकाण त्यांना माहिती नाही.

**०८.** आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना काठी व लाथाबुक्क्यांनी पाठीवर, हातावर व पायावर मारहाण केल्याबाबत फिर्यादी निखील (सा.क्र.१), जखमी साक्षीदार वैशाली (सा.क्र.२), मोनाली (सा.क्र.३) व सोपान (सा.क्र.४) यांनी स्पष्टपणे नाकारले आहे. फिर्यादी निखील (सा.क्र.१), जखमी साक्षीदार वैशाली (सा.क्र.२), मोनाली (सा.क्र.३) व सोपान (सा.क्र.४) यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. करिता सहा. सरकारी अभियोक्ता उत्तरसूचक प्रश्न विचारले असता, परंतु त्यांनी तक्रारीमधील अधोरेखांकित भाग-अ पोलिसांना सांगितले नसल्याचे कथन केलेले आहे. त्यांनी उलटतपासादरम्यान मान्य केले की, त्यांची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झाली असुन त्याबाबतचा तडजोड अर्ज (नि.क्र.४५) व पुरसीस (नि.क्र.४६) अभिलेखावर दाखल केलेली आहे.

**०९.** एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी निखील (सा.क्र.१), जखमी साक्षीदार वैशाली (सा.क्र.२), मोनाली (सा.क्र.३) व सोपान

(सा.क्र.४) हे जखमी साक्षीदार असून त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. तसेच आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्यांच्या सामाईक उद्देशपुर्तीकरीता फिर्यादी व साक्षीदारांना लाकडी काठीने व विटांनी मारहाण करुन, लाथाबुक्कयांनी मारहाण करुन फिर्यादीस गंभीर व साक्षीदारांना साध्या स्वरुपाच्या दुखापती पोहोचवल्या, धाकदपटशा केला व शिवीगाळ केली किंवा कसे याबाबत त्यांनी काहीही कथन केलेले नाही. आरोपींतर्फे जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र (नि.क्र.५२ ते ५५), घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.५०) व जप्ती पंचनामा (नि.क्र.५१) मान्य करण्यात आलेले आहेत. सदर पुरावा आरोपींविरूद्धचा गुन्हा निःसंशय सिद्ध करण्याकरीता पुरेसा नाही. करीता, आरोपींविरुद्धचा गुन्हा प्रस्तुत प्रकरणात सिद्ध झाला नाही. सबब, अभियोग पक्ष आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम १९० अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यास असमर्थ ठरला. म्हणून मुद्दा क्र.१ ते ८ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

<u>मुद्दा क्र.**९** करिता -</u>

**१०.** मुद्दा क्र.१ ते ८ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन प्रस्तुत प्रकरणातून आरोपींना निर्दोष मुक्त करणे योग्य व न्यायोचीत होईल. जप्त मुद्देमाल लाकडी काठी व विटा मुल्यहिन असल्यामुळे आवाहनाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर नष्ट करणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.९ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. आरोपी **क्र.१. मयुर उर्फ हरीष पांडुरंग विटकरे, आरोपी क्र.२. संदिप दगडु विटकरे, आरोपी क्र.३ संकेत पांडुरंग विटकरे, आरोपी क्र.४.पांडुरंग शंकर विटकरे, आरोपी क्र.६ निर्मला सोपान विटकरे** यांची भारतीय न्याय संहिता कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सह कलम १९० च्या गुन्ह्यातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. जप्त मुद्देमाल लाकडी काठया व विटा मुल्यहिन असल्यामुळे आवाहनाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर नष्ट करण्यात यावा.

**३.** आरोपींचे जात मुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**४.** आरोपींनी रक्कम रु.२५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र देऊन भारतीय नागरिक

सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ अन्वये पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

VIDYA SHRIPATI KASBE Digitally signed by VIDYA SHRIPATI KASBE Date: 2026.04.02 16:17:42 +0530

ठिकाण : श्रीरामपूर.
दिनांक : ०२.०४.२०२६.

**(**विदया एस**.** कसबे**)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.३, श्रीरामपूर.